**<u>फौजदारी किरकोळ अर्ज क्र. २५३/२०२२ मधील निशाणी क्र.१३ वरील आदेश</u>**

प्रस्तुत अर्जाद्वारे अर्जदार हिने महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण कायदा कलम २३ प्रमाणे अंतरिम पोटगीची मागणी केली आहे.

२. **अर्जामागची थोडक्यात पार्श्वभूमी अशी की,**

प्रस्तुत अर्जदार हिने उपरोक्त कलमान्वये पोटगी मागण्याकरीता केलेला मूळ अर्ज हा अर्जदाराच्या साक्षीपुराव्याकरीता प्रलंबित आहे. सामनेवाला क्र.१ हा तिचा पती आहे. अर्जदार हिचे कथन की, अर्जदार व सामनेवाला क्र.१ यांचा विवाह मे, २०१० मध्ये झाला. लग्नाच्या १५ ते २० दिवस सामनेवाला यांनी अर्जदार हिला व्यवस्थित नांदवले व त्यानंतर घर सोडून जा असे म्हणुन तिला त्रास देण्यास सुरुवात केली. सामनेवाला क्र.१ हा अर्जदार हिस मारहाण करत असे व तिला उपाशी पोटी ठेवत असे. सामनेवाला यांनी अर्जदार हिस मानसिक त्रास देवून घरातून हाकलून लावले व तेव्हापासून अर्जदार ही तिच्या आईवडीलांकडे माहेरी आश्रितांसारखे जीवन जगत आहे.

३. अर्जदार ही कमी शिक्षीत असून तिच्या आईची आर्थिक परिस्थिती देखील खुप हालाखीची आहे. अर्जदार क्र.१ ही आईकडे मजुरीने धुनीभांडी करुन दोन्ही मुलांचा शिक्षणाचा खर्च करत आहे. अर्जदार हिचे आईची आर्थिक परिस्थिती गरीबीची असल्याने अर्जदार हिचा सांभाळ करणे त्यांना अत्यंत कठीण होत आहे. अर्जदार हिच्या पालनपोषणाची, औषधोपचाराची व मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी ही सर्वस्वी सामनेवाला क्र.१ यांची आहे व त्याने ती नाकारली आहे.

४. सामनेवाला क्र.१ ते ३ हे लोकांची शेती बटईने करुन चांगले उत्पन्न घेतात व त्यामधुन त्यांना वर्षाला पाच लाख रुपये इतके उत्पन्न मिळते. सामनेवाला यांना शेती व जनावरांपासून दरसाल एकुण २० लाख रुपये निव्वळ उत्पन्न मिळते. त्यामुळे सामनेवाला यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत चांगली आहे. तसेच सामनेवाला क्र.१ याचेवर इतर कोणीही अवलंबून नाहीत. याउलट, अर्जदार ही कमी शिक्षीत असून तिला उत्पन्नाचे कोणतेही साधन उपलब्ध नाही. त्यामुळे सामनेवाला याच्या उत्पन्नाचा विचार करता अर्जदार क्र.१ ते ३ यांच्या दैनंदिन गरजेकरीता, खर्चापोटी व शिक्षणासाठी दरमहा प्रत्येकी रुपये ३,०००/– असे एकुण रु.९,०००/– इतकी रक्कम सामनेवाला क्र.१ यांचेडकून

अंतरीम पोटगी म्हणून देण्याचा आदेश व्हावा, अशी प्रस्तुत अर्जाव्दारे विनंती केली आहे.

५. सामनेवाला यांनी नि.१७ येथे पुरशीस दाखल करुन मुळ अर्जाचे कामी दिलेले म्हणणे (नि.१०) हेच प्रस्तुत अर्जास म्हणणे म्हणुन वाचण्यात यावे असे कथन केले आहे.

६. उभय पक्षांच्या कथनावरुन उपस्थित झालेली बाब व त्यावरील माझा निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नमूद करीत आहे –

| अ.क्र. | विचारार्थ बाबी | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार हे अंतरिम पोटगीचा आदेश मिळण्यास पात्र आहेत काय ? असल्यास किती ? | होय, एकत्रीतपणे दरमहा रुपये ४,०००/– प्रमाणे. |
| २. | काय आदेश ? | अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो. |

## <u>कारणमिमांसा</u>

७. अर्जदार यांचे वकीलांचा युक्तिवाद ऐकला. अर्जदार यांचे वकीलांनी अर्जात नमुदप्रमाणे युक्तिवाद केलेला आहे. सामनेवाला क्र.१ यास पुरेशीस संधी देवूनही प्रस्तुत अर्जावर त्यांचेतर्फे युक्तिवाद करण्यात आला नाही. त्यामुळे त्यांचेविरुध्द विनायुक्तिवादाचा आदेश पारीत करण्यात आला.

**विचारार्थ बाब क्र.१ करीता –**

८. अर्जदार व सामनेवाला यांच्यातील नातेसंबंध सामनेवाला यांनी नाकारलेले दिसून येत नाही. अर्जदारा हिच्या म्हणण्यानुसार सामनेवाला क्र.१ याने सुरुवातीच्या काही दिवसानंतर तु घर सोडून जा असे म्हणुन अर्जदार हिस त्रास देण्यास सुरु केला. तिचा वेळोवेळी शारीरीक व मानसिक छळ केला व तिला व्यवस्थित नांदवले नाही. सामनेवाला क्र.१ ते ४ यांनी चार वर्षापूर्वी कोणतेही संयुक्तीक कारण नसताना अर्जदार क्र.१ ते ३ यांना नेसत्या कपडयांनिशी घरातून हाकलून दिले आहे.

९. याउलट सामनेवाला यांनी अर्जदार ही स्वतःहून माहेरी निघून गेल्याचे नमूद

केले आहे. तसेच ती विवाहानंतर काही दिवस सासरी सामनेवाला बरोबर राहिल्याचे नमूद केले आहे. सामनेवाला याच्या कथनानुसार अर्जदार ही वारंवार सामनेवाला यास अपमानित करुन त्याच्यासोबत भांडण करुन माहेरी निघुन जात होती. तरीही अर्जदार हिच्या वागण्यात बदल होईल या आशेने सामनेवाला क्र.१ हा अर्जदार हिस नांदवत होता. मे, २०१७ मध्ये अर्जदार ही भांडण करुन परस्पर मुलांसह घरातील चार तोळे सोने व रोख रक्कम रु.५०,०००/– घेऊन माहेरी निघुन गेली आहे. सामनेवाला याने अर्जदार हिस नांदण्यास आणण्यासाठी गेले असताना अर्जदार व तिच्या आईने सामनेवाला यास शिवीगाळी व मारहाण केले. सामनेवाला क्र.१ यास कोणतेही उत्पन्नाचे साधन नसून तो मोल मजुरीने उदरनिर्वाह करत आहे असेही सामनेवालाने कथन केले आहे.

१०. उभय पक्षांचे कथन विचारात घेता त्यांनी एकमेकांविरुध्द गंभीर स्वरुपाचे आरोप केल्याचे दिसून येते. त्यामुळे उभय पक्षांना त्यांचे म्हणणे पुराव्यानिशी सिध्द करण्यास संधी देणे आवश्यक दिसून येते. निश्चीतच प्रकरणाचा गुणवत्तेवर निर्णय देण्यास बराच अवधी लागणार आहे. सामनेवाला क्र.१ याने अर्जदार हिचेशी असलेले नातेसंबंध नाकारले नसल्यामुळे अर्जदार हिचा सांभाळ करण्याची जबाबदारी सामनेवाला क्र.१ याचेवर आहे.

११. अर्जदार हिच्या कथनाप्रमाणे तिला उत्पन्नाचे कोणतेही साधन उपलब्ध नाही. सदरची बाब तिने निशाणी क्र.५ व ९ वर उत्पन्नाबाबतच्या प्रतिज्ञापत्रात नमुद केले आहे. तसेच अर्जदार हिला स्वतःच्या पालनपोषणाचा व इतर कपडेलत्यासाठी खर्च करणे तिला शक्य नाही. अर्जदार हिने सामनेवाला क्र.१ व ३ हे बटाईने शेती करत असल्याने त्यांना चांगले उत्पन्न मिळते. सामनेवाला यांना शेती व जनावरांपासून दरवर्षी सुमारे २० लाख इतके निव्वळ उत्पन्न मिळते. परंतु या कथनापुष्टयर्थ अर्जदार हिने कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. अर्जदार ही तिचा स्वतःचा उदरनिर्वाह करण्यास सक्षम नसल्याबाबत प्रतिज्ञापत्र सादर केले आहे.

१२. सामनेवाला याच्या म्हणण्यानूसार तो मोल मजुरी करुन उदरनिर्वाह करत असल्याने अर्जदार हिने कथन केल्याप्रमाणे सामनेवाला याचे कोणतेही उत्पन्नाचे स्त्रोत नाही. सामनेवाला याने वरील कथनाच्या पुष्टयर्थ उत्पन्नाबाबत कोणताही कागदोपत्री

पुरावा दाखल केलेला नाही. सद्य परिस्थितीमध्ये सामनेवाला क्र.१ याचेवरती अर्जदार हिचा सांभाळ करण्याची जबाबदारी आहे. त्याचप्रमाणे सामनेवाला क्र.१ चे वय व शारीरीक क्षमता विचारात घेता तो चांगला जवान धडधाकट पुरुष आहे. आजच्या काळात एखादी व्यक्ती दररोज सुमारे ४०० ते ५०० रुपये कमावू शकतो. त्यामुळे एकंदरीत संपूर्ण अर्जाचा व दाखल कागदोपत्री पुरावाच्या विचार करता सामनेवाला क्र.१ हा दरमहा अर्जदार क्र.१ हिस रु.२,०००/– व अर्जदार क्र.२ व ३ यांना प्रत्येकी रु.१,०००/– असे एकुण रु.४,०००/– इतके अंतरीम पोटगी सहज देवू शकतो असे म्हणता येईल. सध्याची महागाई तसेच अर्जदार क्र.२ व ३ यांचे शिक्षण व अर्जदार क्र.१ हिच्या पालनपोषणाची बाब लक्षात घेता, अर्जदार क्र.१ ते ३ यांना, एकत्रीतपणे रक्कम रुपये ४,०००/– अंतरीम पोटगी देणे योग्य राहिल. **अशा परिस्थितीत मी मुद्दा क्र.१ चे उत्तर त्याप्रमाणे देत आहे.**

**मुद्दा क्र.२ संदर्भात**

१३. वरील विवेचनावरुन मुद्दा क्र.२ चे उत्तरासाठी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज **(नि.१३)** अंशतः मंजूर करण्यात आला.

२. सामनेवाला क्र.१ यास असा निर्देश देण्यात येत आहे की, त्याने अर्ज दाखल तारखेपासून अर्जदार क्र.१ ते ३ यांना एकत्रीतपणे दरमहा रुपये ४,०००/– (अक्षरी रुपये चार हजार फक्त) प्रमाणे अंतरीम पोटगीची रक्कम म्हणून प्रकरणाचा अंतीम निकाल लागेपर्यंत द्यावी.

३. सदर आदेशाची प्रत अर्जदार व सामनेवाला यांना विनामुल्य देण्यात यावी.

दिनांक – ३०/०५/२०२४.

(**श्रीमती पी.एस.गोवेकर**)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कोर्ट क्र.३,
मोहोळ.